


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरूवार १२ डिसेंबर २०२४ | अंक ३० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अटीत काय झाला बदल?



महाराष्ट्र शासनाच्या महायुती सरकारची ङ्गमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणफ योजना सर्वात लोकप्रिय ठरली आहे. विधानसभा निवडणुकीत या योजनेमुळे महायुतीमधील तिन्ही पक्षांना भरभरुन यश मिळाले. त्यामुळे महायुतीने २३० आमदारांचा टप्पा गाठला. या योजनेत बदल झाल्याची माहिती सोशल मीडियावर येत आहे. त्यासंदर्भात तत्कालीन महायुती सरकारमध्ये महिला आणि बालकल्याण मंत्री असलेल्या आदिती तटकरे यांनी स्पष्टीकरण केले आहे. या योजनेत कोणताही बदल झालेला नाही? असे त्यांनी स्पष्ट केले आहे. ङ्गमुस्लिम कुटुंबात दोन अपत्यांपेक्षा जास्त अपत्य असतील तर त्या कुटुंबाला लाडकी बहीण योजनेचा लाभ देऊ नये ही आमची मागणी आहे. कारण मतदान करताना यांना मोदी नको असतात, हिंदुत्वाच्या विचारांचं सरकार नको. मात्र प्रत्येक शासकीय योजनेचा सर्वाधिक लाभ हे मुस्लिम कुटुंब घेतात. मग तुम्ही हा लाभ कशाला घेता? असा सवाल नितेश राणे यांनी व्यक्त केला आहे.

## आदिती तटकरे काय म्हणाल्या?

सोशल मीडियावर माहिती देताना आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल रिल्स व व्हिडिओच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. लोकप्रतिनिधी म्हणून लक्ष एक महिला लोकप्रतिनिधी म्हणून याबाबतीत मी स्वतः जातीने लक्ष ठेवून आहे. तरी, याबाबत समाज माध्यमांतून होण-या अपप्रचारास कोणीही बळी पडू नये, असे आवाहन आदिती तटकरे यांनी केले आहे. ङ्गमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणफ योजनेचा लाभ राज्यातील जवळपास अडीच कोटी महिलांना मिळत आहे. या योजनेत शासनाकडून पात्र महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहे. ही रक्कम थेट बँक खात्यात जमा होत आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणूक जाहीरनाम्यात ही रक्कम २१०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते. त्यामुळे आता महायुतीचे सरकार आल्यामुळे या योजनेची रक्कम २१०० रुपये होण्याची शक्यता आहे.विधानसभा निवडणुकीपूर्वी या योजनेच्या यशाची कल्पना महाविकास आघाडीला आली होती. त्यामुळे महाविकास आघाडीने निवडणूक जाहीरनाम्यात महिलांना दर महिन्याला तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु जनतेने महायुतीच्या बाजूनेच आपला कौल दिला.

## देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाइंड चा तातडीने शोध घ्यावा -आ.सुरेश धस



आष्टी । प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे भरदुपारी राजरोसपणे राज्य रस्त्यावर अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला आहे अत्यंत गंभीर असून या घटनेचा सखोल तपास करून या घटनेतील मास्टर माईंड कोण आहे? याचा छडा पोलिसांनी लावला पाहिजे असे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त करत केजची घटना अंत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. माध्यमांशी बोलताना आ.धस म्हणाले की,केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आल्याची घटना सोमवारी घडली. एखाद्या गावच्या प्रथम नागरिक असलेल्या व्यक्तीचे अपहरण होते त्यानंतर त्याची हत्या करण्यात येते ही अत्यंत निंदनीय बाब असून या घटनेतील जे कोणी मुख्य आरोपी असतील त्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे.शिवाय या घटनेच्या मागे नेमके मास्टर माईंड कोण आहेत? कारण भर दिवसा हत्या करण्याचे धाडस या आरोपींनी केले आहे त्यामध्ये निश्चितपणे कोणीतरी बडीशक्ती असावी त्यामुळे याबाबतचा तपास देखील पोलिसांनी करण्याची मागणी आ.धस यांनी केली आहे.

## प्र.कुलगुरु डॉ. वाल्मीक सरवदे यांची श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास सदिच्छा भेट



माजलगाव ( प्रतिनिधी ) दि.११ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांनी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली त्यांचे स्वागत स्थानिक कार्यवाह ऍड विश्वास जोशी व प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे यांनी केले. या भेटीदरम्यान त्यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमाबाबत कौतुक केले आणि महाविद्यालयामध्ये होत असलेल्या सात दिवसीय आरोग्य शिबिरास भेट दिली व महाविद्यालयाच्या एकूण प्रगतीचा आढावा घेऊन महाविद्यालयामध्ये होत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांचा व होत असलेल्या कार्यक्रमाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी बीड जिल्हा उध्वस्त करु नका-राजेसाहेब देशमुख

अंबाजोगाई । प्रतिनिधी काल केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरण व आज परळीचे नामांकित व्यापारी अमोल डुबे यांचे खंडणीसाठी अपहरण प्रकरण उघडकीस आल्याने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पुर्वी खंडणी, मर्डर, अपहरण, ब्लॅकमेल, रोड रॉबरी, माफियागिरी सारखे प्रकार मुंबई, पुणे, नागपूर सारख्या मोठ्या शहरात घडल्याचे ऐकायला मिळायचे. पण, सध्या असे सर्व गंभीर गुन्हे बीड जिल्ह्यात सर्वत्र सर्रासपणे घडत आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात सर्वसामान्य माणसाला जगणे मुश्किल झाले आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख यांचा गुन्हेगारांवर कुठलाही धाक आणि वचक राहिला नसून कायदा आणि सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाने जगावे की, मरावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे बीड जिल्ह्यातील जनतेला आणखीन किती दिवस उघड्या डोळ्यांनी पहावे लागणार आहेत. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून कृपया स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी बीड जिल्हा उध्वस्त करू नका असे नम्र आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांना केले आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचे अपहरण करण्यात आले आणि त्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच त्यांचा मृतदेह केज तालुक्यातील दैठणा परिसरात मिळून आल्याने खळबळ उडाली. या घटनेला १२ तास ही उलटत नाहीत, तोच परळीचे नामांकित व्यापारी अमोल विकास डुबे यांचे ही खंडणीसाठी अपहरण झाल्याची घटना काल रात्री परळी शहरातील औद्योगिक वसाहत परिसरात घडल्यानंतर या घटनेने शहरासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. परळी येथील पेट्रोल पंपाचे मालक विकास डुबे यांचे चिरंजीव व परळीच्या औद्योगिक वसाहती मध्ये बॅटरीचा व्यवसाय करणारे नामांकित व्यापारी अमोल विकास डुबे हे काल रात्री आपला व्यवसाय बंद करून घराकडे निघालेले असताना या परिसरात स्विफ्ट कार मध्ये दबा धरून बसलेल्या काही अज्ञांत आरोपींनी अमोल डूबे यांस गाठून मारहाण केली आणि स्विफ्ट कार मध्ये घालून अंबाजोगाईच्या दिशेने घाटात नेऊन अमोलला घरी कॉल करायला लावला व सदर आरोपीने रूपयांची मागणी केली. अशी चर्चा आम्हाला ऐकावयास मिळाली आहे. तसेच केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या केल्याच्या घटनेस १२ तास लोटले आहेत. हे दोन्ही प्रकार पाहून खरंच बीडचा बिहार झालाय या चर्चेला पुष्टी मिळत आहे. या दोन्ही प्रकरणांतील आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच कठोर कारवाई करावी. संतोष देशमुख हे अतिशय शांत, सुस्वभावी व्यक्तिमत्व अशी त्यांची पंचक्रोशीत ओळख होती. त्यांच्या अनेक चांगल्या कार्यामुळे तालुक्यात सुपरिचित होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात मस्साजोग ग्रामपंचायतला अनेक पुरस्कार मिळवून दिले. अशा कर्तबगार व्यक्तीचा खून होणे ही घटना दुर्दैवी व मनाला प्रचंड वेदना देणारी आहे. या खूना मागे नेमका कुणाचा हात आहे..? हे शोधले पाहिजे. त्यामुळे संतोष देशमुख खून प्रकरणाचा व अमोल डुबे अपहरण प्रकरणाचा तपास हा सखोल व जलदगतीने करून आरोपींना कठोर शासन करावे, या दोन्ही प्रकरणांमुळे सुजाण नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून बीड जिल्ह्यातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सरपंच देशमुख खून प्रकरणातील तिस-या आरोपीला अटक

बीड दि.११(प्रतिनिधी) - पवनचक्कीच्या वादातून (दि.९) डिसेंबर रोजी केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांचा खून केल्याची घटना घडली होती. या प्रकणातील एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुण्यातून अटक केली आहे. प्रतिक भीमराव घुले ( वय २५, रा.टाकळी ता.केज) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. तर जयराम माणिक चाटे (वय २१ रा.तांबवा ता. केज), महेश सखाराम केदार (वय २१ रा. मैंदवाडी ता.धारुर) हे अगोदरच पोलिसांनी अटक केलेले आहेत. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. प्रतिक हा खून केल्यानंतर पुण्याच्या दिशेने रवाना झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रवाना केले होते. पोलीस निरीक्षक शेख उस्मान यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील सहायक पोलिस निरीक्षक विजय झोनवाल, भागवत शेलार, बप्पासाहेब घोडके, तुषार गायकवाड, चालक मराडे यांनी ही कारवाई केली. आरोपीला आज न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## अट्टल महाविद्यालयात भारतीय भाषा उत्सव संपन्न

गेवराई, दि. ११ (लोक इच्छा प्रतिनिधी) मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयात भारतीय भाषा उत्सव साजरा करण्यात आला. तमिळ भाषेतील सुप्रसिद्ध महाकवी तथा स्वातंत्र्य सेनानी श्री सुब्रमण्य भारती यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त भारतीय बोलीभाषांचा आणि भारतीय भाषांचा सन्मान घडवून आणण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त अट्टल महाविद्यालयातील कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या भाषा विषयाच्या वतीने प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भाषेचे महत्त्व, जीवनातील भाषेचे स्थान आणि भाषेचा वापर तसेच मातृभाषेचा अभिमान याविषयी विद्यार्थ्यांशी संवाद करण्यात आला. याप्रसंगी मराठी विषयाचे डॉ समाधान इंगळे यांनी भाषा हे मानवी जीवनाच्या प्रगतीतले सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. इंग्रजी विषयाचे प्रा. अरुण जाधव भाषा आणि संस्कृतीचा सन्मान करणा-या गीताचे गायन केले, तर कनिष्ठ महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्रा. गणेश सूर्यवंशी यांनी मराठी बोली भाषेसंदर्भात विवेचन केले. तर प्रा. शरद सदाफुले यांनी विद्यार्थ्यांशी कथेच्या माध्यमातून संवाद साधला.



याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक नवनाथ गोरे डॉ. सुदर्शना बढे, सुरेश ढाकणे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची सदिच्छा भेट



नवी दिल्ली, ११ डिसेंबर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची सदिच्छा भेट घेतली.महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचा हा पहिलाच दिल्ली दौरा आहे. आज दिल्लीत आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती देऊन त्यांचा आदर-सत्कार केला आणि त्यांचे आशिर्वाद घेतले.त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड यांच्या निवासस्थानी गेले. तेथे त्यांना विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती देऊन उपराष्ट्रपती महोदयांचा सत्कार केला आणि त्यांचे आशिर्वाद घेतले.






## लोकशाहीच्या नावाने...!

आत्ताच सुत्राने,
दीली माहिती..!
अंधाराच्या भितीने...
लाईट लावले कीती..?

चोराने दावा केला,
माहितीच्या आधारे..!
आता बोंबतील कशाला...
उगा,बोंबलणारे..!

कारभार हाती आला...
माणूस म्हणून वागावे..!
प्रत्येक माणसाला...
इथे माणूस समजावे..!

गाय -म्हशी,घोडे-हत्ती...
नांदतात येथे एकोप्याने...!
माणूस का भांडत बसती...
लोकशाहीच्या नावाने...!

.................................

**बबनराव वि.आराख**
**गांगलगाव**
**जि. बुलडाणा**

## आक्रमक आघाडी !

ईव्हीएम, निवडणूक आयोगाविरोधात महाविकास आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. राज्यातील महायुती सरकारच्या विशेष अधिवेशनाचा पहिला दिवस विरोधकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे गाजला. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या आमदारांनी शनिवारी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेणे टाळले. हंगामी अध्यक्षांनी काँग्रेस नेते नाना पटोले यांचे नाव पुकारताच सर्वजण सभागृहाबाहेर पडले. मतदानयंत्राद्वारे मतदानात गैरप्रकार झाल्याचा आरोप करत तसेच मतपत्रिकेच्या माध्यमातूनच निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या आमदारांनी १५ व्या विधानसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सदस्यांच्या शपथविधीवर बहिष्कार घातला. आपल्याला विधानसभा निवडणूक निकाल अमान्य आहे. तसेच ईव्हीएममध्ये गडबड आहे, असे म्हणत आघाडीतील काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या तिन्ही पक्षांतील आमदारांनी शपथविधीवर बहिष्कार टाकत सभात्याग केला. मात्र आघाडीतील समाजवादी पक्षाचे अबू आझमी आणि रईस शेख तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) पुण्यातील वडगाव-शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी आमदारकीची शपथ घेतली. त्यामुळे आघाडीत कोणताही समन्वय नसल्याचे दिसून आले. ङ्गलोकशाही झिंदाबादफ, ङ्गआय लव्ह मारकडवाडीफ असे पोस्टर झळकावत आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या आवारात घोषणाबाजी केली. विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले तरी कुठे जल्लोष नाही, मिरवणूक नाही. त्यामुळे महायुतीला जनतेने कौल दिला नसून हा ईव्हीएम व निवडणूक आयोगाचा महायुती विजयी होण्याचा आयोजित कार्यक्रम आहे. आम्ही देखील विजयी आमदार आहोत. त्यामुळे जनतेचा मान ठेवत शनिवारी शपथ न घेता शपथविधी सोहळ्यावर बहिष्कार टाकत आहोत. महायुतीला एवढे मोठे बहुमत मिळाले कसे याबाबत मारकडवाडीच्या लोकांच्या मनातही संशय आहे. त्यांनी बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला पण निवडणूक आयोग व पोलिसांनी त्याला मज्जाव केला. आघाडी मारकडवाडीतील ग्रामस्थांसोबत आहे. २०१४ पासून लोकशाही चिरडण्याचे काम सुरू आहे. या सर्वांचा निषेध म्हणून आमदारकीची शपथ घेत नाही. यापुढे लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही लाँग मार्च काढणार आहोत असा इशारा शिवसेनेचे (ठाकरे गट) आमदार आदित्य ठाकरे यांनी दिला. मारकडवाडीतील काही ग्रामस्थांना अटक करण्यात आली आहे. आम्ही जिंकलो असलो तरी आज शपथ घेणार नाही. निवडणूक निकालावर महाराष्ट्राचा विश्वास नाही. मारकडवाडीने बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला. यात निवडणूक आयोगाचा काय संबंध? पोलिसांचा काय संबंध? गावाने एखादा निर्णय घेतला तर लोकशाही पद्धतीने आलेले महायुती सरकार त्यावर वरवंटा फिरवण्याचे काम करत आहे असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी लगावला. महायुती सरकार जनमताने आलेले नाही असे राज्यातील जनतेचे मत आहे. हे सरकार मते चोरून आले आहे. मारकडवाडीतील मॉक पोलिंग होऊ द्यायला हवे होते. मारकडवाडीतील लोकांचे मत, जनभावना समजून घ्यायला हवी होती असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले. नवनिर्वाचित आमदारांना शपथ घेण्यासाठी रविवार शेवटचा दिवस आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत रविवार संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावी लागेल. अन्यथा त्यांना सोमवारपासून सभागृहाच्या कामकाजात सहभागी होता येणार नाही असा इशारा अजित पवार यांनी दिला. आपण काही तरी वेगळे करतोय हे दाखवण्यासाठी हा प्रकार सुरू आहे असेही ते म्हणाले. आघाडीच्या आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. ज्या जनतेने त्यांना निवडून दिले त्या जनतेचा हा अपमान आहे अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा समाचार घेतला. ईव्हीएमविरुद्ध पुराव्यांशिवाय बोलणे अयोग्य आहे असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाला ७२ लाख मते मिळाली पण फक्त १० आमदार निवडून आले. या उलट अजित पवार गटाला ५८ लाख मते मिळाली पण त्यांचे ४१ उमेदवार निवडून आले. ८० लाख मते मिळालेल्या काँग्रेसचे १५ तर ७९ लाख मते मिळालेल्या शिवसेना शिंदे गटाचे ५७ आमदार निवडून आले हे गणित न समजण्यासारखे म्हणजेच कोड्यात टाकणारे आहे. जोपर्यंत ईव्हीएमविरुद्ध आपल्याकडे आधार नाही तोपर्यंत त्यावर भाष्य करणे योग्य नाही. मात्र मतांचे आकडे आश्चर्यकारक आहेत असे शरद पवार म्हणाले. सुप्रीम कोर्टाने ईव्हीएमविरोधातील याचिका फेटाळल्याने आता कायदेशीर अभ्यास करून कोर्टात जाणार आहोत अशी माहिती राष्ट्रवादीच्या (शप) खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याआधी एक्झिट पोलमध्ये आघाडी आणि महायुती यापैकी कुणालाही १४५ वर जागा मिळणार नाहीत असे सांगितले जात होते मात्र, प्रत्यक्षात निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीला एकहाती सत्ता स्थापन करण्याचा बहुमान मिळाला. तसेच महायुतीतील प्रमुख पक्ष भाजपला १३२ जागा मिळाल्या. यावर कोणाचाच विश्वास बसत नाही. गत काही महिन्यांत ४ राज्यांच्या निवडणुका झाल्या. छोट्या राज्यात अन्य पक्ष पण मोठ्या राज्यात विरोधी वातावरण असतानाही भाजप निवडून आला, हे कसे? असा प्रश्न सा-यांनाच पडला आहे. विधानसभा निवडणुकीत आघाडीला अपयश आल्यानंतर समाजवादी पक्ष आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत मिळत आहेत. महाविकास आघाडीत कोणतीही फूट पडलेली नाही असे शरद पवार यांनी म्हटले आहे. आगामी निवडणुका एकत्रपणेच लढवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे. आम्ही एकत्रपणे येणा-या सर्व निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. पराभव झाल्यामुळे नाराज व्हायचे कारण नाही असे ते म्हणाले. विरोधकांच्या इंडिया आघाडीच्या कारभाराबाबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी नाराजी व्यक्त केली असली तरी संधी मिळाल्यास इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची तयारीही दाखवली आहे. त्यामुळे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर विरोधकांची एकजूट राहील असे दिसते.

# रिझर्व्ह बँकेने परत आणले शंभर टन सोने

सध्या भारतीय रिझर्व्ह बँकेकडे ८५४.७३ मेट्रिक टन सोने आहे. यातील साधारण ५१०.५ टन सोने बँकेने आपल्या देशातच ठेवले आहे. बाकीचे, म्हणजे सुमारे ३४५ टन सोने भारताने विदेशी बँकांमध्ये सुरक्षित ठेवले आहे. त्यातील बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवलेले सोने रिझर्व्ह बँकेने अलीकडेच देशात परत आणले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत व्हावी म्हणून हा निर्णय घेतला गेला आहे. तो का आणि कसा अमलात आणला गेला? एक नजर सोने हा भारतीयांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. भारतात सोन्यामध्ये केली जाणारी गुंतवणूक ही केवळ ङ्गगुंतवणूकफ नसते, तर त्यात लोकांच्या भावना गुंतलेल्या असतात. सोन्याच्या सांस्कृतिक आणि पारंपरिक महत्त्वामुळे भारतीय लोकांचा कल नेहमीच सोने खरेदीकडे राहिला आहे. किडूक–मिडूक का असेना, देशातील प्रत्येक घरात सोने असतेच असते. सोने हा भारतीयांचा वीक पॉइंट आहे असे म्हटले तरी चालेल. त्यामुळेच जागतिक पातळीवर भारत हा सोन्याचा सर्वात मोठा आयातदार आहे. शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि इतर आर्थिक साधनांसारखे गुंतवणुकीचे पर्याय निर्माण होण्याच्या आधीपासूनच भारतात संपत्ती जमवण्यासाठी सोने हा एक पसंतीचा मार्ग मानला आहे. भारतात महागाई किंवा इतर कोणत्याही आर्थिक अनिश्चिततेपासून बचाव करण्यासाठी सोन्याकडे एक सुरक्षित पर्याय म्हणून पाहिले जाते. जगात अमेरिकेकडे सोन्याचा सर्वाधिक साठा आहे. तो ८१३३.४६ टन एवढा आहे. त्यानंतर जर्मनी, इटली आणि फ्रान्स यांचा क्रमांक लागतो. ८५५.७३ टन सोन्यासह भारताचा आठवा क्रमांक आहे. भारत सातत्याने सोने खरेदी करत असल्यामुळे ८४५.९७ टन सोन्याचा साठा असलेल्या जपानला मागे टाकून भारताने आठव्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आश्चर्य म्हणजे, एका अंदाजानुसार भारतीय कुटुंबाकडे असलेले ङ्गघरगुती सोनेफ सुमारे २७ हजार टन आहे. हे सोने जगातील कोणत्याही देशाच्या सोन्याच्या साठ्यापेक्षा कित्येक पटींनी अधिक आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतही सोन्याला तेवढेच महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींमुळे अलीकडे डॉलरचे स्थान डळमळीत होऊ लागले आहे. वाढत चाललेली महागाई, जागतिक बाजाराला लागलेले युद्धांचे ग्रहण आणि जागतिक मंदीची भीती यामुळे जगातले सर्वच देश आता सोने खरेदी करू लागले आहेत. या वर्षी एप्रिल ते सप्टेंबर या काळात आरबीआयने ३२ टन सोने खरेदी केले आहे. भारताची आर्थिक स्थिती चांगली असल्याचेच हे निदर्शक आहे. त्यामुळे आपल्या देशाच्या एकूण चलनसाठ्यातील सोन्याचा वाटा ८.१५ टक्क्यांवरून ९.३२ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. भारताकडे सध्या ८०० टनांपेक्षा अधिक सोने आहे. यातील ३०० टनांहून अधिक सोने देशातच ठेवले आहे तर इतर सोने हे देशाबाहेर, इतर देशांच्या मध्यवर्ती बँकांमध्ये सुरक्षित ठेवले आहे. भारताचे सोने हे ब्रिटन आणि अमेरिकेत ठेवण्यात आले आहे. जगभरातील अनेक देश ब्रिटनच्या बँक ऑफ इंग्लंड या बँकेत सोने ठेवतात. धोका कमी करण्याच्या हेतूने सर्व देशांच्या मध्यवर्ती बँका आपले सोने सुरक्षिततेच्या हेतूने वेगवेगळ्या देशांच्या बँकांमध्ये ठेवतात. त्यामुळे कोणत्याही आपत्तीच्या काळात राजकीय आणि आर्थिक परिस्थिती बिघडली तरी परदेशात ठेवलेले सोने सुरक्षित राहते. नैसर्गिक आपत्तींमुळेही



सोन्याच्या साठ्याचे नुकसान होऊ शकते. परदेशात सोने ठेवल्याने देशातील आपत्तीच्या काळातही आपले काही सोने सुरक्षित राहील याची खात्री असते. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटनने भारताचे सोने बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवले होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही भारताने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स (बीआयएस) यांच्याकडेच आपले सोने ठेवले. या बँकांमध्ये भारताचे ३२४.०१ मेट्रिक टन सोने सुरक्षित ठेवले होते, तर २०.२६ मेट्रिक टन सोने ठेवींच्या स्वरूपात ठेवण्यात आले होते, असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. १९९१ मध्ये एक वेळ अशी होती की भारताकडे आयात करण्यासाठी कोणतेही परकीय चलन शिल्लक नव्हते. आत्यंतिक गरजेमुळे भारताला आपले सोने गहाण ठेवून कर्ज घ्यावे लागले होते. त्यावेळी भारताने ४७ टन सोने गहाण ठेवले आणि २.२ अब्ज डॉलर्सचे कर्ज घेतले होते. माजी राज्यपाल सी. रंगराजन यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटले आहे की, सरकारने सोने गहाण ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई विमानतळावर चार्टर विमान उभे होते. ४७ टन सोने या विमानात ठेवण्यात आले होते. हे सोने घेऊन विमान इंग्लंडला गेले. त्यानंतरच भारताला कर्ज मिळाले. अर्थात त्यानंतर भारताने गहाण ठेवलेले सोने सोडवलेच, पण परकीय चलनाचा साठाही वाढवला; परंतु कर्ज संपले तरी सोने मात्र तिथेच होते. तेच सोने आता परत आणले जात आहे. हे सोने आताच परत आणण्यामागे दोन हेतू आहेत. एक म्हणजे आज भारताची आर्थिक स्थिती अत्यंत चांगली आहे. आज भारताची परकीय गंगाजळी ६८८ बिलियन डॉलर्स म्हणजे भारताच्या ११ महिन्यांच्या आयातीसाठी पुरून उरेल एवढी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सध्या सुरू असलेल्या इस्रायल तसेच युक्रेन आणि रशियाच्या युद्धपरिस्थितीमुळे एकूणच अर्थव्यवस्था आणि राजकारण सातत्याने बदलते आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर पाश्चात्त्य देशांनी रशियाच्या एकूण संपतीच्या ५० टक्के म्हणजे सुमारे ३०० बिलियन डॉलर्सची संपत्ती सध्या गोठवून ठेवली आहे. त्यात सोने आणि डॉलर्सच्या स्वरूपातली करन्सी आणि असेट्स आहेत. त्यामुळे रशिया आज स्वत:चेच पैसे वापरू शकत नाही. सध्या भारत आणि ब्रिटन यांचे संबंध चांगले आहेत; परंतु राजकीय गणिते कशी आणि केव्हा बदलतील हे कुणालाही कधीच सांगता येत नाही. त्यामुळे काळजी घेतलेली कधीही चांगलीच. आरबीआयने याच वर्षी मेमध्ये देखील १०० टन सोने भारतात आणले असून आता नुकतेच, म्हणजेच धनत्रयोदशीच्या दिवशी १०२ टन सोने लंडनहून भारतात आणले. अजूनही इतकेच टन सोने भारतात आणण्यात येणार आहे. अर्थातच हे सर्व सोने आपलेच आहे, जे आजवर लंडनच्या बँकेत होते. हे १०० टन सोने भारतात आणण्यासाठी अनेक महिन्यांचे नियोजन करण्यात आले. अर्थ मंत्रालय, आरबीआय आणि सरकारच्या इतर शाखांसह स्थानिक अधिकारी नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये गुंतले होते. शंभर टन सोने एका देशातून दुसऱ्या देशात हलवणे हे काही सोपे काम नाही. त्यासाठी मोठी सुरक्षा व्यवस्था उभारणे गरजेचे होते. युक्रेन, इस्त्राईल या भागात युद्धे सुरू आहेत तर भारतासाठी इतर दहशतवादी संघटनांचे आव्हानही आहेच. शंभर टन म्हणजे जवळपास दहा मोठे ट्रक भरेल इतके सोने ते वाहून आणण्यासाठी २० मोठ्या हत्तींइतक्या जागेची गरज आहे. त्याचे बाजारातील मूल्य जवळपास ८.५ अब्ज डॉलर म्हणजे ७,०९,२२,०८,७५,००० रुपये होते. विशेष म्हणजे भारतात सोने आणण्यासाठी आरबीआयने सीमा शुल्कात सूट दिली आहे; परंतु आयातीवर लावण्यात आलेल्या एकात्मिक जीएसटीमध्ये मात्र कोणतीही सूट देण्यात आलेली नाही. कारण हा कर राज्यांशी सामायिक केला जातो. हे सोने आणण्यासाठी भारतीय वायुसेनेच्या सी १७ ग्लोबमास्टर या भारताच्या सर्वात मोठ्या मालवाहतूक विमानाचा वापर करण्यात आला. ते एका वेळी ८० टन वजन वाहू शकते. भारतीय वायुसेनेकडे अशी ११ विमाने आहेत. अत्यंत गोपनीयतेने आणि कडेकोट सुरक्षेत हे शंभर टन सोने भारतात परत आणण्यात आले. मुंबईतील मिंट रोडवरील रिझर्व्ह बँकेच्या जुन्या कार्यालयाच्या इमारतीत सोने ठेवले जाते. याशिवाय नागपुरातील तिजोरीतही पूर्ण सुरक्षेसह सोने ठेवले जाते. आता आणलेले सोनेदेखील याच दोन्ही तिजोरींमध्ये ठेवण्यात आले आहे. सोने ही अत्यंत सुरक्षित संपती आहे. ते अस्थिर संपत्तीच्या श्रेणीत मोडत नाही. सोन्याला संपूर्ण जगात सर्वाधिक लिक्विडिटी (तरलता) आहे असे मानले जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे युद्ध किंवा आर्थिक संकटाच्या काळात सोने स्थिर राहते किंवा त्याच्या किमती वाढतात. त्यामुळे भारतीयच नव्हे तर, सारे देशही सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्याचाच पर्याय निवडतात हे आजवर अनेकदा सिद्ध झाले आहे.

# बँक ग्राहक अन् लोकपाल तक्रार यंत्रणा

गेले वर्षभर दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर विविध ग्राहक हितासंबंधी विषयांवर तब्बल ५२ भागांची ङ्गजागो ग्राहकफ ही मालिका सादर करण्यात आली. त्यातील एका भागात बँक ग्राहक आणि लोकपाल तक्रार यंत्रणा या विषयावर तज्ज्ञांच्या आणि ग्राहक प्रतिनिधींच्या मतांचा थोडक्यात आढावा घेऊ. बँकेचा ग्राहक आणि बँक कर्मचारी यांच्यातील नातेसंबंधात गेल्या २० वर्षांत झालेला बदल यात ठळकपणे विचारात घेतला गेला. पूर्वी सहसा ग्राहक बँकेत गेला की तिथला कर्मचारी त्याला नावानिशी ओळखत असे. ग्राहकही तेथील कर्मचाऱ्यांना ओळखत असे. ग्राहकाला मिळणारी वागणूक जिव्हाळ्याची असे. कारण सहसा ५ ते ७ वर्ष कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत नसत. संगणक आल्यानंतर मात्र यात वेगाने बदल झाले. ग्राहकांच्या खात्यांच्या संख्येत वाढ झाली. व्हीआरएसमुळे कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाली. त्यांच्या वारंवार बदल्या होऊ लागल्या. त्यानंतर आलेल्या जनधन योजना, तृतीय पक्षी उत्पादने जसे की, म्युच्युअल फंड, विमा योजना, खाती या सगळ्या सेवांमुळे आधीचे जिव्हाळ्याचे संबंध खूपच कमी झाले आणि एक प्रकारे अलिप्तता येऊ लागली. शाखा वातानुकूलित झाल्या पण आतले वातावरण मात्र गरम होऊ लागले. भाड्याच्या शाखांचे लहान जागी स्थलांतर, विलीनीकरण यामुळेही ग्राहकांना होणाऱ्या असुविधांमध्ये भर पडली. तक्रारींची संख्या वाढतच गेली. मग अशा तक्रारींचा निराकरण कसं करावं, त्यासाठी आरबीआयचे नियम काय, बँकिंग लोकपाल म्हणजे काय, अशा विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या भागात केला गेला. तसेच काही उपाय आणि सूचनांचीही दखल आरबीआयने घ्यावी अशी मागणी केली गेली. १९९९ पर्यंत सर्व बँकांची सेवाशुल्क म्हणजे चेकबुक, चेक रेटर्नचे, डीडीचे स्टेटमेंटचे शुल्क सारखीच असते. पण १९९९ मध्ये रिजर्व्ह बँकेने प्रत्येक बँकेला आपापल्या संचालक मंडळाच्या परवानगीने हे शुल्क ठरवण्याची मुभा दिली. त्यानंतर काही बँकांनी हे शुल्क वाढवले. त्याचा फटका सामान्य ग्राहकांना बसला. बँकांचे उत्पन्न मात्र वाढले. त्यामुळे सर्व बँकांचे सेवा शुल्क हे सामान प्रमाणात असावे, तसेच ते शाखांमध्ये ग्राहकाला वाचण्यासाठी सहज उपलब्ध असावे अशी सूचना वजा मागणी करण्यात आली. कार्डाचा वापर, पासबुक प्रिंटिंग, पिन बदलणे या गोष्टींना सराव व्हायला सामान्य ग्राहक तसेच ग्रामीण भागातील ग्राहकांना वेळ लागला. ऑनलाइन बँकिंग सुविधा सुरु झाल्यावर द्यावा की न द्यावा या दुविधेत शहरी ग्राहकही फसला तर ग्रामीण ग्राहकाची काय कथा? मग यावर उपाय काय? तर आपली आर्थिक फसवणूक झालीय हे लक्षात येताक्षणी १९३० या नंबरवर तसेच बँकेच्या कस्टमर केअरच्या टोल फ्री नंबरवर लगेच संपर्क करून तक्रार दाखल करावी. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच ३ ते ४ तासांच्या गोल्डन पीरियडमध्ये तक्रार केल्यास ती रक्कम दुसऱ्या खात्यात जमा होण्याआधीच थांबवता येते. प्रत्यक्ष ज्या शाखेत खाते असते तिथे लवकरात लवकर लेखी तक्रार दाखल करणे गरजेचे असते. सध्या कागदावर नाव, खाते क्रमांक, फसवणूक झालेली रक्कम, तक्रारींचे स्वरूप, ई–मेल पत्ता, फोन नंबर हे सर्व लिहून याची पोहोचपावती घ्यावी. ई–मेल द्वारेही तक्रार करता येते. तक्रार बँकेला मिळाल्यानंतर साधारणतः १५ दिवसांत बँकेकडून ग्राहकाला उत्तर मिळणे अपेक्षित असते. नाही मिळाले तर एक लेटर द्यावे. तरीही उत्तर नाही मिळाले तर आरबीआयच्या बँकिंग लोकपालाकडे तक्रार दाखल करावी. यासाठी ://... किंवा आरबीआयच्या :// .. वर तक्रार दाखल करावी. बँक, आणि डिजिटल साठी इथे तक्रार करू शकता. इथे ऑनलाइन तक्रार करण्यासाठी लॉज अ कंप्लेंट असा पर्याय असतो. त्यात तुम्ही कोर्टात पण तक्रार दाखल केलीय का असा एक प्रश्न असतो. त्याचे उत्तर जर हो असे लिहिले तर तुमची तक्रार इथे नोंदवलीच जात नाही, हे कृपया लक्षात ठेवावे. कारण एकाचवेळी २ ठिकाणी तुम्ही तक्रार नोंदवू शकत नाही. एकदा तुमची तक्रार नोंदवली गेली की तुम्हाला द्वारे आणि मेलने तक्रारीचा नंबर येतो. यावर साधारण २ महिन्यांत निर्णय अपेक्षित असतो. तो निर्णय जर ग्राहकाला मान्य नसेल, तर त्यावर अपील करता येते. थोडक्यात आपले पैसे सुरक्षित कसे राहतील आणि त्यात कशी वाढ होईल हे ग्राहकाने सजगपणे बघितले पाहिजे आणि तक्रार उद्भवलीच तर न घाबरता तिचे निराकरण करून घेतले पाहिजे हेच यातून स्पष्ट केले गेले. मुंबई ग्राहक पंचायतीचे २०२४ हे सुवर्णमहोत्सवी वर्ष. गेली पन्नास वर्षे ही संस्था ग्राहक जागृतीचा प्रचार आणि प्रसार अविरतपणे करत आली आहे. त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत

## जागतिक मानव अधिकार दिनानिमित्त भाकपची बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने;

# ईव्हीएम ऐवजीबॅलेट पेपरवर मतदान घ्या व मणिपूरचा हिंसाचार थांबविण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलण्याची मागणी

बीड प्रतिनिधी लोकशाही व देश वाचविण्यासाठी ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे, अदानी कंपनी समूहाच्या आर्थिक घोटाळ्याची संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशी व्हावी, अदानी समुहाला पाठिशी घालणाऱ्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी व मणिपूर राज्यातील हिंसाचाराला लगाम लावून शांतता प्रस्थापित करण्याच्या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जागतिक मानव अधिकार दिनानिमित्त बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आले. भारतातील मणिपूर मध्ये मे २०२३ मध्ये हिंसाचाराचा उद्रेक झालेला असून, दिवसंदिवस या भागातील अत्याचारामध्ये वाढ होत चालली आहे. या हिंसाचारामुळे सुमारे ६० हजार पेक्षा जास्त लोक निर्वासित छावण्यात राहत आहे. दररोज घडत असलेल्या हिंसाचारात हजारापेक्षा जास्त नागरिकांना आपला जीव गमावा लागत आहे. मणिपूर राज्याचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केला आहे. त्याच्या पक्षपाती व्यवहारामुळे राज्यात हिंसाचार व अशांतता पसरली आहे. जनतेचा विश्वास गमवलेल्या मुख्यमंत्री यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे. अशांततेच्या आगीत मणिपूर होरपळले जात असताना, देशाच्या पंतप्रधानांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. ज्यांची घरे जाळण्यात आली, हिंसाचारात मृत्यू झालेल्या कुटुंबाला केंद्र सरकारने जाहीर केलेली मदत देखील दिलेली नसल्याचा संताप भाकपच्या वतीने व्यक्त करण्यात आला. ईव्हीएम बाबत देशातील मतदार नागरिकांच्या मनात संशय व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर ईव्हीएम बाबत हजारो तक्रारी आल्या असून, अनेक शंका उपस्थित केल्या जात आहे. त्यामुळे मतपत्रिकेवर मतदान घेण्यात यावी अशी मागणी सर्वत्र होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अदानी कॉर्पोरेटद्वारा शेअर मार्केटमध्ये गैर मार्गाने केलेले व्यवहार हिडेनबर्ग प्रकरणातून उघडकीस आले आहे. भारतीय शेअर मार्केटचे नियंत्रण करणाऱ्या सेबीची संशयास्पद भूमिका उजेडात आली आहे. मात्र याबद्दल भाजपच्या मोदी सरकारने पूर्णतः अदानी कार्पोरेटची पाठराखण केली आहे. नरेंद्र मोदी सरकारचे सौर ऊर्जेबाबतचे धोरण संपूर्णतः आदानी कॉर्पेटच्या फायद्यासाठी रचण्यात आले आहे. अदानी यांच्या सौर ऊर्जे च्या उत्पादनांना धंदा मिळावा यासाठी गैरमार्गाने नियम बनविण्यात आले आहे. नाव शेतकरी व जनतेचे आणि धंदा मात्र फक्त आदानीचा होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अदानी प्रकरणी अमेरिकेतील न्यायालयात खटला सुरू करण्यात आला असून, त्याच्या पुतण्यावर समन्स जारी करण्यात आला आहे. यामुळे भारत सरकारच्या कार्यपद्धतीचे धिंडवडे निघाले आहेत. याबद्दल पारदर्शकपणे चौकशी करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती नेमण्याची मागणी भाकप व सर्व विरोधी पक्ष करीत आहे. कॉर्पोरेट धार्जिण्या धोरणामुळे देशाची अर्थव्यवस्था धोक्यात आलेली असल्याचे कॉ. नामदेव चव्हाण यांनी सांगितले. मणिपूरच्या मुख्यमंत्री यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, मणिपूर राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करावी, हिंसाचारग्रस्त कुटुंबांना तात्काळ मदत द्यावी, अदानी कार्पोरेटचा शेअर घोटाळा, सौर ऊर्जा घोटाळ्याबद्दल संयुक्त संसदीय समिती स्थापन करून चौकशी व्हावी, सेबीचे अध्यक्षांची हकालपट्टी करावी, मंत्रालय आणि प्रशासनातील अदानीच्या दलालांना अटक करावी, कोसळत असलेल्या जीडीपी आणि वाढत्या बेरोजगारी बद्दल उपाययोजना करावी व ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी भाकपच्या वतीने करण्यात आली आहे. या आंदोलनात भाकपचे कामगार नेते कॉ नामदेव चव्हाण, जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड भाऊराव प्रभाळे, किसान सभेचे पुढारी कॉम्रेड ज्योतीराम हूरकुडे, शिक्षक संघटनेचे कॉ डी.जी तांदळे, राजकुमार कदम, मोहन सुपेकर, सुधाकर डोळस, आसाराम मुळे, पंकज चव्हाण, रामहरी मोरे, नवनाथ रांजवण, दादा घुमरे, देविदास पवार, महिला फेडरेशन च्या ॲड करुणा टाकसाळ, रिक्षा युनियन चे सलीम शेख, आयुब पठाण, अमजद शेख, गोपीचंद पवार, शेखर रइस, शेख अनिस, एआयएसएफ ची जानवी हुरकुडे,आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरूवार १२ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# लिंबागणेश येथील जलजीवनचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे :- डॉ.गणेश ढवळे

--- लिंबागणेश:- ( दि.११ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जलजीवन योजनेंतर्गत ८४ लाख ६८ हजार ६१६ रूपये अंदाज पत्रक असलेले काम अर्धवट रखडलेले असुन तातडीने पूर्ण करण्यात यावे या मागणीसाठी आज दि.११ बुधवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता म हासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांनी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. आंदोलन स्थळी राजेंद्र मोराळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व.स्व.) जिल्हा परिषद बीड, प्रकल्प संचालक जलजीवन मिशन जिल्हा परिषद बीड यांच्या आदेशाने कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद बीड,उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग बीड, श्रीनिवास गुप्ते,शाखा अभियंता नाबार्ड बीड, अरविंद दुबाले कनिष्ठ अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा बीड यांनी लिंबागणेश येथील जलजीवन योजनेंतर्गत अंतर्गत उर्वरित कामे तातडीने पूर्ण




करूण्याच्या सुचना कंत्राटदार यांना देऊन योजनेचे चाचणीचे काम मार्च अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस जमादार संतोष राऊत,ढाकणे,बांगर,पो.म रकुटे, खाडे उपस्थित होते. आंदोलनात आक्षेपार्ह विधान करत बदनामी करत गोंधळ घालणा-या बाळासाहेब मुळे वर एनसी दाखल --- लिंबागणेश येथील जलजीवन योजनेंतर्गत कामाची चौकशी लाऊन आंदोलन करणारे डॉ.गणेश ढवळे यांच्या विषयी आंदोलनस्थळी आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करत गोंधळ घालणारे जलजीवनचे काम करणारे बदनामी करु अशी धमकी देणारे बाळासाहेब मुळे यांच्यावर डॉ.गणेश ढवळे यांच्या तक्रारीवरून नेकनुर पोलिस ठाण्यात प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या आदेशाने भारतीय न्याय संहिता( बी.एन.एस.)२०२३ अंतर्गत धारा ३५१(२) अंतर्गत एनसी दाखल करण्यात आली असून संबंधित प्रकरणात न्यायालयात मानहानीचा दावा दाखल करणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

# प्रभाग क्र.४ मध्ये पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन

## फुटल्याने नागरिकांची पाण्यासाठी तारांबळ



माजलगाव । प्रतिनिधी प्रभाग क्र.४ ईदगाह मोहल्ला येथील ईदगाह कॉर्नर वर पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन लीकेज झाल्याने प्रभागातील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ आल्याने प्रभाग क्रमांक ४ चे मागच्या वेळेसचे नगरसेवक राहुल लंगडे हे स्वता टेंडर चलवीत असतांना सुद्धा स्वताच्याच प्रभागामध्ये बघ्याची भूमिका घेत असल्याने प्रभाग क्रमांक (४)चे नागरिकांची तारांबळ होत आहे यामुळे नाराज असलेले नागरिक मतदाता राहुल लंगडे यांना मतदान करतील का अशी चर्चा प्रभागात होत आहे. व त्याच प्रभागातील नगरपालिकेला अवघ्या १४ मते कमी पडलेले सय्यद लतीफ दिवान हे कोणताही पद नसताना नगरपरिषदेचा पाठपुरावा करून माजलगाव न.परिषदे मार्फ़त पिण्याच्या पाण्याची पाईपलाईनची झालेली लिकेज स्वतः बसून दुरुस्त करून घेतली

# किन्ही फाटा येथून मुलीला फूस लावून पळून नेले

बीड, दि ११,(जिमाका)- ऋचिता गोविंद बांगर वय १७ वर्षे राहणार भायाळा, तालुका पाटोदा, जिल्हा बीड वैद्य किन्ही फाटा येथून मुलीला फूस लावून पळून नेले असल्याचे फिर्याद गोविंद अश्रुबा बांगर यांनी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोलीस ठाणे पाटोदा येथे दि. १०.१२. २०२४ रोजी दिली असून मुलीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मुलीचा रंग गोरा, अंगात निळ्या रंगाचा टॉप, पांढ-या रंगाची पॅन्ट, ओढणी काळी, उंची ५ फूट, नाक सरळ, केस काळे व सरळ, शरीराचा बांधा सडपातळ, वय १७ वर्षे असून अशा वर्णनाची मुलगी आढळून आल्यास पोलीस चौकी अंमलदार बी.एस. वाघ सहाय्यक फौजदार, मोबाईल नंबर ८६६८२२८९४५ तसेच पोलीस निरिक्षक पोलीस ठाणे पाटोदा, प्रभारी अधि-कारी एस, एम, जाधव, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे पाटोदा मोबाईल क्रमांक ७७२२०३५२०९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोलीस ठाणे पाटोदा बी.एस. वाघ यांनी केले आहे.

# थेट लाभ योजनांसाठी लाभार्थ्यांना नोंदणीचे आवाहन

बीड, दि ११,(जिमाका)- राज्य शासनाच्या श्रावन बाळ व संजय गांधी योजनेचे अनुदान वितरण हे माहे डिसेंबर २०२४ पासून डीबीटीद्वारे वितरित करण्यात येणार असून सदर वितरण करण्याकरिता संजय गांधी योजना व श्रावण बाळ सेवा योजनेचे लाभार्थी यांचे डीबीटी पोर्टलवर रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. बीड तालुक्यातील श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी यांची डीबीटी पोर्टलवर रजिस्ट्रेशन व माहिती अद्यावत करणे बाकी असून सदरची डीबीटी झाली नाही तर संजय गांधी योजना व श्रावण बाळ योजनेचे अनुदान बंद होऊ शकते याची लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदर डीबीटी पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी लाभार्थी यांचे खालील प्रमाणे कागदपत्र असणे आवश्यक आहे. डीबीटी करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, बँक पासबुक, आधार कार्ड, रेशन कार्ड, संजय गांधी योजनेचा लाभार्थी असल्यास दिव्यांगाचे प्रमाणपत्र, मृत्यू प्रम णपत्र, आजाराबाबतचे प्रमाणपत्र, परितक्ता असल्याबाबतचा मान्य न्यायालयाचा पुरावा.**https://docs.google.com/forms/d/IFAIpQ>lscxd6juxdvdhw2heg7d4gyzjaeedmdvf5kguexyr3hjp-rbA/viewform** या संकेतस्थळावर स्वतः तलाठी यांच्यामार्फत तहसील कार्यालय विभाग येथे माहिती भरावी, असे तहसीलदार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## संस्कार विद्यालय सहल



# जीएसटी अभय योजनेबाबत व्यापार्यांना मार्गदर्शन कार्यशाळा व चर्चासत्र

बीड : प्रतिनिधी

वस्तु व सेवा कर कार्यालयाच्या वतीने व जालना विभागाचे राज्यकर सहआयुक्त श्रीकांत गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली जीएसटी अभय योजनेबाबत बीड जिल्ह्यातील सनदी लेखापाल व करसल्लागार तसेच व्यार्पायांसाठी बीड येथे मार्गदर्शन कार्यशाळा व चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. या चर्चासत्रात राज्यउपायुक्त योगेश शिंदे यांनी जीएसटी अभय योजना, तिचे स्वरुप, यासह विविधतेवर अभ्यासपूर्ण माहिती दिली तसेच अभय योजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.वस्तु व सेवा कर कार्यालय विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या चर्चासत्राला वस्तु व सेवाकर विभागाचे




सहाय्यक राज्यकर आयुक्त प्रदिप फाटे, सनदी लेखापाल संघटनचे सचिव श्रीगोपाल लड्डा, सनदी लेखापाल संघटना अंबाजोगाईचे सचिव पुरुषोत्तम रांदड, व्यापारी संघटनेचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, विनोद पिंगळे, राजेंद्र बन्सोडे, जवाहरलाल कांकरीया, प्रकाश कनगावकर, सूर्यकांत महाजन, नागेश मिटकरी, सुदाम चव्हाण, तुकाराम साळुंके, दत्तासेट तापडीया, वर्धमान खिवंसरा यांच्यासह इतर मान्यवर सदस्य तसेच जिल्हयातील व्यापारी आर्दीची उपस्थिती होती. अभय योजनेची चर्चासत्रात सविस्तर माहिती मिळाल्याने जिल्ह्यातील सनदी लेखापाल व करसल्लागार तसेच व्यार्पायांनी जीएसटी विभागाचे आभार मानले आहे.

# महिलांनी एकत्र येऊन त्यांच्या मागण्या शासनाकडे कराव्यात-ॲड.महारूद्र नागरगोजे

जामखेड । प्रतिनिधी महिलांनी एकत्र येऊन त्यांच्या न्याय मागण्या शासनाकडे कराव्यात, तसेच ज्यांच्या घरी या महिला काम करतात त्यांनीही मदत केली पाहिजे.यांना साप्ताहिक सुट्टी मिळाली पाहिजे. त्या सुट्टीचं त्यांना मानधन मिळाले पाहिजे. अशा प्रकारच्या मागण्या संघटना करत आहे आणि जामखेडमध्ये याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.असे अध्यक्षीय भाषणात यावेळी बोलताना एडवोकेट महारूद्र नागरगोजे म्हणाले. जामखेड शहरातील बाजार तळ येथे ग्रामीण विकास केंद्र येथे आज दिनांक १० डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता मानवाधिकार दिना निमित्ताने संघर्ष घरेलु असंघटित महिला कामगार अभियानाचा समारोप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी ते बोलत होते. २६ नोव्हेंबर संविधान दिन ते १० डिसेंबर २०२४ घरेलु कामगार यांच्या हक्कासाठी व सन्मानासाठी व्यापक अभियानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संविधान उद्देशिकेचे पुष्प अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बापूसाहेब ओव्हळ म्हणाले की,असंघटित महिला घरेलू कामगार यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांना पेन्शन मिळाली पाहिजे, बंद पडलेले महामंडळ पुन्हा सुरू झालं पाहिजे, त्यांच्या आरोग्याचे प्रश्न सुटले पाहिजेत. त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे. अशा प्रकारचे मुद्दे घेऊन ही संघटना जामखेड मध्ये कार्यरत आहे .आपणही या संघटनेचे बळ वाढवले पाहिजे व संघटीतपणे राहिले पाहिजे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट महारुद्र नागरगोजे होते तर प्रमुख पाहुणे ग्रामीण विकास केंद्र चे संचालक बापूसाहेब ओव्हळ हे होते. यावेळी संघर्ष घरेलु कामगार संघटना अध्यक्षा द्वारकाताई पवार, रेखाताई बहिर, निर्मला माने, रेश्मा बागवान,सचिन भिंगारदिवे,ज्योती लोने,मानसी घाटगे आदि माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक द्वारकाताई पवार व सूत्रसंचालन ज्योती लोने यांनी केले तर आभार प्रदर्शन ऋषीकेश गायकवाड यांनी मानल

# मस्साजोग खून प्रकरणी कडक कारवाई करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची मागणी; पवनचक्की प्रकरणी बीडच्या आमदारांचीही चौकशी व्हावी

बीड (प्रतिनिधी)

दि.११ : केज तालुक्यातील म स्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी. यात कुणीही राजकारण करू नये. तसेच, बीड मतदारसंघातील पवनचक्की प्रकरणी बीडच्या आम दारांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचे मूळ कारण पवनचक्की ठरली. याप्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांनी राजकारण करू नये. आरोपींवर कडक कारवाई करावी, अशी आपली स्पष्ट भूमिका आहे. मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचा-



यांकडून शेतक-यांची पिळवणूक केली जात आहे, यात स्थानिक आमदारांचे आर्थिक हितसंबंध देखील आहेत. त्यांच्या वरदहस्ताम ुळे अनेक शेतक-यांना त्रास होत आहे. याबाबत आपण अनेकदा आवाज उठविलेला असून बीडच्या आमदारांसह पवनचक्की कंपनीच्या अधिकारी, कर्मचा-यांची कसून चौकशी करण्याची गरज आहे. या साखळीमुळे बीड मतदारसंघातील अनेक शेतक-्यांच्या जमिनी बळकावल्या, पिकांची हानी केली, मोबदला देण्यास टाळाटाळ होत असून शेतक-यांवर आत्महत्येची वेळ आली आहे. मस्साजोगसारखी अप्रिय घटना टाळण्यासाठी शासनाने बीडच्या आमदारांसह मतदारसंघातील पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचा-यांची कसून चौकशी करून दोषीविरोधात कारवाई करावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

# महाराष्ट्रात पुन्हा हूडहुडी... तापमान ४ अंशांनी घटले ; दहा दिवस गारठा टिकणार

पुणे : राज्यातील तापमानात एका दिवसात ४ अंशांनी घट झाल्याने बहुतांश शहरात हुडहुडी भरली आहे. थंडी आणखी वाढ होणार असल्याचा अंदाज सेवानिवृत्त हवाम ानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला. गेल्या काही दिवसांत मफेंगलफ चक्रीवादळाने डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातील थंडी चांगलीच वाढवली होती; पण वादळ जमिनीवर आल्यानंतर थंडी गायब झाली; पण आता पुन्हा उत्तर भारतात, मार्गस्थ होत असलेले पश्चिमी (झंझावात) वारे व समुद्र सपाटीपासून साडेबारा किमी. गेल्या चार-पाच दिवस पुण्यातील किमान तापमान हे २० अंशांच्या जवळपास होते. त्यामुळे उष्णता जाणवत होती. अचानक रविवारी थंडीत वाढ झाली आणि किमान तापमान १६ अंशांवर नोंदवले गेले. उंचीवर वाहणारे उच्च वेगवान पश्चिमी वा-यांच्या झोतामुळे थंडीत वाढ होईल. रविवारपासून खान्देश, नाशिकपासून थंडीम ध्ये हळूहळू वाढ होऊन संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा पुढील १० दिवस म्हणजे बुधवार, दि. १८ डिसेंबरपर्यंत थंडी टिकून राहण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीरच्या बारामुल्लासह बहुतेक भागात जोरदार हिमवृष्टी होऊ लागली आहे. नाशिककरांना पुन्हा हुडहुडी एकाच दिवसात पारा ४ अंशांनी घसरून १२.५ वर आला आहे. त्यामुळे शहरवासीयांना पुन्हा हुडहुडी भरली आहे. शनिवारी किमान तापमान १६.६



अंशावर होते. पहाटे धुके पसरलेले दिसून आले. धुळ्याचे तापमान ९.५ अंशांवर गेल्या आठ दिवसांपासून कमी झालेला थंडीचा जोर रविवार अचानक वाढला. धुळ्याच्या शहराच्या तापमानाचा पारा ९.५ अंशांवर आल्याची माहिती कृषी महाविद्यालयातर्फे देण्यात आली. नागपुरात पारा हळूहळू घसरत असल्याचे चिन्ह आहे. फेंगल चक्रीवादळाचे सावट ओसरले असले तरी ढगाळ वातावरण नागपूरसह विदर्भात कायम आहे. ही स्थिती दोन दिवस कायम राहील, तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाचीही शक्यता आहे.

# महाराष्ट्रच्या राजकारणातला नवा अध्याय, फडणवीस-अजित पवार दिल्लीत, शिंदे मुंबईत

**खातेवाटपावर असलेल्या मतभेदामुळे हा विस्तार रखडल्याची चर्चा आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिल्लीला गेले आहेत**



महाराष्ट्रात सत्ता स्थापन होऊन ६ दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. पण राज्य सरकारचा मंत्रिमंडळाचा विस्तार अद्याप झालेला नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महायुतीत काही खात्यांवरुन असमन्वय असल्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार रखडल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे भाजपची यादीदेखील अद्याप फायनल झाली नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. खातेवाटपाचा तिढा न सुटल्यामुळे दिल्लीत बैठक होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज दिल्लीत दाखल झाले आहेत. त्यांनी दिल्लीत दाखल होऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि आणखी काही ज्येष्ठ नेत्यांची भेट घेतल्याची माहिती आहे. दुसरीकडे अजित पवार देखील दिल्लीला रवाना झाल्याची माहिती आहे. खातेवाटपाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत आज महत्त्वाची बैठक होण्याची शक्यता आहे. पण या बैठकीला एकनाथ शिंदे जातील का? याबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम आहे. दरम्यान, महायुतीच्या तीनही प्रमुख नेत्यांची उद्या मुंबईत खातेवाटपावर चर्चा करण्यासाठी बैठक होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## दिल्लीत आज रात्री बैठक होण्याची शक्यता

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित पवार आणि खासदार सुनील तटकरे हे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या दिल्लीतील निवासस्थानी दाखल झाले आहेत. महायुतीच्या खातेवाटपावर आज दिल्लीत बैठकीची शक्यता आहे. त्यासाठीच आज देवेंद्र फडणवीस आणि नंतर अजित पवार दिल्लीत दाखल झाले आहेत. या दोन्ही नेत्यांची आज रात्री पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत बैठक होऊ शकते. खातेवाटपाचा सस्पेन्स अद्यापही कायम आहे. तसेच एकनाथ शिंदे हे दिल्लीत बैठकीसाठी जाणार की नाहीत याबाबतही सस्पेन्स कायम आहे.

# लाच घेताना चक्क न्यायाधीशालाच पकडलं

## सातारा लाचलुचपतची मोठी कारवाई

सातारा । प्रतिनिधी आपल्यावरील अन्याय किंवा अत्याचारविरुद्ध दाद मागण्याचे अंतिम ठिकाण म्हणजे न्यायालय. लोकशाही प्रक्रियेत न्यायालय ही स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात असल्याने प्रशासन आणि राजकीय दबाव यांच्याविरुद्धची लढाई देखील मोठ्या आशेने न्यायालयात लढली जाते. मात्र चक्क न्यायाधीश महोदयांनाच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याने राज्यात खळबळ उडाली आहे. साताऱ्यातील एका हॉटेलमध्ये सापळा रचून न्यायाधीश महोदयांना पोलिसांनी रंगेहात पकडले. त्यानंतर, गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे न्यायालयाच्या आवारातच ही घटना घडली आहे. त्यामुळे, सर्वसामान्यांच्या न्याय-हक्काचं शेवटचं आश्वासक ठिकाण असलेल्या न्यायपालिकेवरील विश्वासाला देखील या घटनेनं तडा गेला आहे. पुणे-सातारा अँटी करप्शन विभागाने संयुक्तिकपणे सार्तािात मोठी कारवाई केली आहे.





सातारा जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश महोदयांविरुद्धच गुन्हा दाखल झाला आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्यासह तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले, त्यानंतर गुन्हा दाखल करुन काहींना अटक केली आहे. पाच लाख रुपयांच्या लाच प्रकरणात न्यायाधीश महोदयांसह तीघांना रंगेहात पकडल्याने न्यायपालिका क्षेत्रात खळबळ उडाली आहे. फिर्यादीच्या वडिलांना जामिन देण्यासाठी पाच लाखांची मागणी करण्यात आली होती, अशी प्राथमिक माहिती आहे. विशेष म्हणजे जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातच या घडामोडी घडल्या आहेत. येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून अँटीकरप्शनच्या पोलिसांनी सर्वांना रंगेहात पकडले, त्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेने सातारा जिल्ह्यासह राज्यभरात खळबळ उडाली आहे. ज्या न्यायव्यवस्थेवर सामान्य माणसांचा शेवटचा विश्वास असतो, त्याच न्यायव्यवस्थेवरही या कारवाईनंतर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. दरम्यान, सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास हा न्यायपालिकेवर आहे, पोलिस यंत्रणांकडून अन्याय झाला तरी न्यायालयात आपणास दाद मिळेल, न्यायाधीशांच्या खुर्चीवर बसलेल्या न्यायमूर्तींकडून आपल्यावरील अन्याय दूर होईल, अशी सर्वसाधारण भावना असते. मात्र, चक्क न्यायाधीश महोदयच लाच घेताना आढळून आल्याने विश्वास कुणावर ठेवायचा असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. पोलीस, व प्रशासनातील भ्रष्टाचाराच्या घटना सातत्याने समोर आल्या आहेत. पण, थेट न्यायपालिकेतील वरिष्ठ अधिकारीच अडकल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे

# आ.सुरेश धस यांना मंत्रिमंडळात काम करण्याची संधी द्यावी-कासम पठाण



कडा । प्रतिनिधी आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदासंघातील विक्रमी मतांनी विजयी झालेले आमदार सुरेश धस यांना महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात काम करण्याची संधी द्यावी, अशी मागणी शिरूर तालुक्यातील वडाळी चे ग्रामपंचायत सदस्य कासम पठाण यांनी केली आहे. आ.धस हे सर्वसमावेशक नेतृत्व असून त्यांच्याकडे कोणत्याही जातीपातीला थारा नाही त्यामुळे ते बहूजनाचे नेते आहेत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७७ हजारापेक्षा अधिक मताधिक्यांनी विजयी झाले असून मतदार संघाबरोबर राज्यात त्याची एक वेगळी ओळख झाली आहे त्यामुळे त्यांचा राजकीय लाभ आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांबरोबर महापालिका, नगरपालिका नगरपरिषद नगरपंचायतच्या निवडणुकीत पक्षाला मोठ्या प्रमाणात फायदा होण्याची शक्यता अधिक आहे. आ.धस यांनी गेल्या वर्षाच्या महायुतीच्या कार्यकाळात कोट्यवधी रुपयांचा निधी आणून विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावले आहेत.त्यामुळे नव्याने होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात आमदार धस यांना मंत्रीमंडळात काम करण्याची संधी द्यावी,अशी मागणी पठाण यांनी केली आहे.

# जामगाव शाळेत आष्टी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन समारोप

आष्टी । प्रतिनिधी तालुक्यातील ग्राम विभागातील नेताजी सुभाष चंद्र बोस विद्यालय बिडसांगवी येथील कृष्णा रमेश काराडे विद्यार्थ्यांनी आधुनिक रिमोटच्या माध्यमातून ड्रोन ड्रोन बनवला आहे या रोडला रोडला आमच्या रिमोटच्या माध्यमातून कामे करू शकतो त्याच्यात जर त्याने वापरतात तर दुकानात डोन्ट काम करू शकतो असे विद्यार्थ्यांनी सांगितले कृष्णा करांडे यांचे वडील महाभयंकर संकट कोराणा काळात आलें असताना रमेश करांडे कोराणा काळात निधन झाले आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील जामगाव ठिकाणी येथील निवृत्ती धस विद्यालय गेल्या दोन दिवस पासून तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन सुरू आहे ह्या विज्ञान प्रदर्शनात शनिवारी सात डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात समोरोप झाला आहे ह्यावेळी व्यासपीठावर बीडी हंबर्डे महाविद्यालय प्राचार्य डॉक्टर सोपान निंबोरे गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव विस्ताराधिकारी गुड केंद्रप्रमुख उगले मॅडम प्राचार्य श्रीकांत मोकाशे मुख्याध्यापक विष्णू आदनाक आदी मान्यवर उपस्थित होते गेल्या दोन दिवसांपासून तालुकास्तरीय विज्ञान प्रदूषण जवळपास १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता पारगाव जो निवृत्ती दस विद्यालय जामगाव गणेश विद्यालय आष्टी आजबे विद्यालय शाळा जय भवानी विद्यालय कडा कारखाना नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय बीड सांगवी या विद्यालयंस बघून झाला होता नेताजी विद्यालय शुभम करडुळे व कृष्णा कारंडे आधुनिक ड्रोनचे विद्यार्थ्याचे लक्ष वेधून घेतले यांच्या यशाबद्दल माननीय आमदार श्री सुरेश आणा धस यांचे स्वीय विकास तात्या साळवे नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय विद्यालयाचे मुख्याध्यापक डोकें प्रशिक्षण वाडेकर सर बीड सांगवी सरपंच नंदकिशोर करांडे सेवा सोसायटीचे चेअरमन सुभाष तात्या गणगे बबनराव करांडे संपत ढोबळे हारीचद करांडे शहादेव चव्हाण कृष्णा पाणतावणे सोमनाथ घुले उपसरपंच संतोष शेठ नरवडे ललेश नरवडे गोकुळ नरवडे आरेफ शेख बजरंग करांडे विजय करांडे अमोल करांडे संजय बावणे बारकु ढोबळे आदि अभिनंदन केले

# आष्टी तालुक्यात आर्थिक विवंचनेलाकंटाळुन एकाची आत्महत्या

कडा । प्रतिनिधी हाताला काम मिळत नसल्याने निर्माण झालेल्या गरिबी व कर्जबाजारी परिस्थितीला कंटाळुन तालुक्यातील भवरवाडी येथे एकाने चिंचेच्या झाडाला दोरी साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.अप्पासाहेब भवर( ४३) असे मृताचे नाव असून (दि.६) दुपारी १:०० च्या दरम्यान सदर घटना भवरवाडी येथे घडली. मागील काही दिवसांपासून आप्पा भवर यांना हाताला काम मिळत नव्हते.यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा या विवंचनेत ते असायचे.यातूनच शुक्रवारी दुपारी त्यांनी चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलीस ठाण्याचे पो. नि. यांच्या आदेशानुसार ठाणे अंमलदार काकडे,पोलीस नाईक मुंडे व पो.शि.माळी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी रविंद्र भवर यांनी दिलेल्या जबाबावरून आष्टी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली. याचा पुढील तपास पो.ना. मुंडे हे करत आहे.आप्पा भवर यांच्या पश्चात पत्नी,एक मुलं,दोन विवाहित मुली, नातवंड असा परिवार आहे.



# बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चऱ्हाटा येथे थेट शेतकऱ्यांशी संवाद साधून प्रश्नांचे केले निराकरण

बुधवार दिनांक ११ (लोक इच्छा प्रतिनिधी) डिसेंबर रोजी चऱ्हाटा मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामकाजांचा आढावा घेण्यात आला . या बैठकीला मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी ( ग्राम महसूल अधिकारी ) , ग्रामसेवक , कृषी सहायक , बीएलओ , पोलीस पाटील , स्वस्त धान्य दुकानदार तसेच अंगणवाडी सेविका इत्यादी उपस्थित होते . सर्वप्रथम सर्व गावकरी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्यातर्फे चंद्रकांत शेळके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला व त्यानंतर बैठकीस सुरुवात झाली. सुरुवातीलाच तहसीलदारांनी सांगून टाकले की ङ्ग तुमचे प्रश्न तुम्ही बिनधास्तपणे माझ्यासमोर मांडा . ही कसली बैठक आहे म्हणून ताण तणाव न घेता अगदी गप्पा मारत मारत आपण सगळ्यांचे प्रश्न जाणून घेऊ व त्यांना सक्षमपणे सोडवू ङ्ग.

सर्वसामान्य लोकांच्या अडचणी जाणून घेऊन , त्यांची प्रलंबित कामे याबद्दल सविस्तर चर्चा करून त्यावर तात्काळ कार्यवाही करावी , अशा सूचना संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या . गावकऱ्यांनीही आपले प्रश्न गावासंबंधी असो किंवा वैयक्तिक असो बेधडकपणे प्रश्न मांडले आणि तहसीलदारांनी त्यांचे यथोचित समाधान केले . यातुन त्यांची कार्यतत्परता आणि लोकांविषयी असलेला



कनवाळूपणा दिसून येतो . त्यानंतर कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक , कृषी सहाय्यक यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांपर्यंत योजना लवकरात लवकर पोहोचवाव्यात त्या पारदर्शक असाव्यात , वेळोवेळी गावांना भेटी द्याव्यात व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात , शेतकऱ्यांची कामे तात्काळपणे पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी दिल्या . तदनंतर उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला . ग्रामपंचायत अधिकारी यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत तसेच त्यांना सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत .त्यांची सर्व कामे वेळेवर पूर्ण केली पाहिजेत. अशाही सूचना दिल्या . चऱ्हाटा मंडळातील स्मशानभूमीचा प्रश्न लोकांनी त्यांच्यासमोर मांडला . त्यानुसार म गाव तेथे स्म शानभूमी म अंतर्गत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी गावकऱ्यांना लवकरात लवकर जमीन उपलब्ध करून त्यांचा स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल , असे आश्वासन दिले . त्यानंतर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा प्रत्यक्ष दुकानात जाऊन , स्थळ पाहणी करून घेण्यात आला . एकही पात्र लाभार्थी रेशन मिळण्यापासून वंचित राहू नये अशा फक्त सूचना सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना शेळके यांनी दिल्या .

यानंतर उपस्थित असलेले सर्व बीएलओ यांना नवीन नाव नोंदणी संदर्भात सूचना दिल्या . उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी सजग असतात . ग्राउंड लेव्हल ला जाऊन सर्वांचे प्रश्न जाणून घ्या , असे त्यांचे म्हणणे असते . बैठकीत पुढे बोलताना प्रामुख्याने अनुदानापासून कोणीही पात्र शेतकरी वंचित राहू नये , तसेच सलोखा योजनेचा प्रचार , प्रसार , प्रसिद्धीकरणावर भर द्यावा , असे यावेळी तहसीलदारांनी सांगितले . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले .

देशाचं भवितव्य आणि देशाचा विकास हा सध्याच्या तरुण व युवा पिढीवर अवलंबून आहे . जर त्यांना योग्य ते शिक्षण व मार्गदर्शन मिळाले तर सुदृढ पिढी सुदृढ देशाची निर्मिती करते . या जाणिवेने तहसीलदार यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चऱ्हाटा येथे सदिच्छा भेट दिली . तेथील विद्यार्थ्यांची प्रगती , त्यांचा हजेरीपट तसेच शाळेचे वातावरण यांची पाहणी केली . शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती परदेशी यांनी सत्कार करून शाळेबद्दल माहिती दिली . शाळेची आत्तापर्यंतची प्रगती व भविष्यातील त्यांचे असलेले उद्दिष्ट तहसीलदारांसमोर मांडले . शाळेत दिला जाणारा पूरक आहार , योग्य शिक्षण व त्यांची कौतुकास्पद असलेली उपस्थिती याबद्दल तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्टाफ व विद्यार्थ्यांचे कौतुक केले .

तहसीलदार शेळके यांनी ग्रामीण भागात स्वतः येऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या, याबद्दल सर्वसामान्य जनतेने समाधान व्यक्त केले .

यावेळी चऱ्हाटा मंडळाचे मंडळ अधिकारी श्री एम एच जायभाये , चऱ्हाटा व भाळवणी सजेच्या ग्राम महसूल अधिकारी अश्विनी डोळस, पालवन सजेचे ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण आगलावे , पिंपळवाडी सजेच्या ग्राम महसूल अधिकारी कुमारी माधुरी आर्दड , मंजरी हवेली सजेचे ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड , मंडळातील कृषी सहाय्यक , पोलीस पाटील व ग्रामसेवक इत्यादी उपस्थित होते .

बैठक संपन्न झाल्यावर तहसीलदार शेळके यांनी चऱ्हाटा येथील शेतकरी अरविंद देवराव उबाळे , गट नंबर ५ मधील रब्बी ई पीक पाहणी नोंदणीचे प्रात्यक्षिक करून दाखवले . तसेच पिकाची पाहणी केली . सर्वांनी लवकरात लवकर ई पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे करावी असेही त्यांनी आवाहन केले . यावेळी अधिकची माहिती देताना शेळके म्हणाले की ई पीक पाहणीचा जो कालावधी आहे त्याच्या वेळापत्रकामध्ये थोडासा बदल करण्यात आलेला आहे . नोव्हेंबर पासून सुरू होणारी पिक पाहणी आता १ डिसेंबर पासून सुरू करण्यात आली आहे .१डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना आपल्या रब्बीच्या पिकांची पाहणी करता येणार आहे . त्यानंतर १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये सहाय्यक स्तरावरील ई पीक पाहणी केली जाणार आहे . शेतकऱ्यांच्या माध्यमातून ही पीक पाहणी करत असताना डीसीएस ॲपच्या माध्यमातून ही पिक पाहणी केली जाणार आहे . ती करत असताना तंतोतंत जिओ फेन्सिंगच्या माध्यमातून होणार असल्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या गटांमध्ये उभे राहूनच ईपीक पाहणी करावी लागणार आहे .अशा प्रकारची इफेक्ट पाहणी केल्यानंतर त्यातील १०% पाहणी ही ग्राम महसुल अधिकारी यांच्या माध्यमातून तपासली जाणार आहे, असे नमूद केले .

ग्रामीण भागात सर्वसामान्य जनतेत मिसळून त्यांच्याशी संवाद साधणारा , त्यांच्या समस्या जाणून घेणारा , सोबतच विविध विभागाचे अधिकारी , कर्मचारी यांना घेऊन फिरणारा तहसीलदार दर्जाचा अधिकारी बीड जिल्ह्याने किंबहुना पहिल्यांदाच बघितला असावा .

अशा प्रकारे जनतेशी थेट संवाद असल्यास निश्चितच त्यांच्या अडचणींचे निराकरण होईल आणि प्रशासन वेगवान होईल यात शंका नसावी.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com